आर.एन.आय. MAHMAR/2005/14922 ● Registered Postal Registration No. PCW/081/2024-2026 ● Date of Publication : शनिवार, १९ सप्टेंबर २०२६ ● Posted at BPC Vishrambagwada CSO Pune Daily.

# फुलकिडी, मावा यांना अटकाव





सी. बी. बाचकर | डॉ. एस. एम. गांगुर्डे | बी. टी. पाटील

**टोमॅटो पिकामध्ये सद्यःस्थितीत फुलकिडे, पांढरी माशी व मावा या किडींचा प्रादुर्भाव आढळत आहे, या किडींच्या नियंत्रण व्यवस्थापनाची माहिती घेऊयात.**

## फुलकिडे



टोमॅटोवरील फुलकिडे

फुलकिड्यांच्या थ्रीप्स टबॅकी, स्क्रिटोथ्रीप्स डोरसॅलिस, फ्रॅंकलिनिइल्ला शुल्टझीई (Frankliniella schultzei) या प्रमुख प्रजाती असून, त्या मिरची, कांदा, टोमॅटो, वांगी, भेंडी, कपाशी, भुईमूग इ. अनेक पिकांवर आढळतात.

**ओळख :** ही कीड अतिशय छोटी, निमुळती व नाजुक असते. फिक्कट पिवळी किंवा करड्या रंग, लांबी एक मि.मी.पेक्षा कमी असते. प्रौढांना पंख असतात. पिलांना पंख नसल्यामुळे पानांवर इकडून तिकडून पळताना दिसतात.

**नुकसानीचा प्रकार**

या किडीची पिले व प्रौढ पाने खरवडून त्यातून बाहेर येणारा रस शोषून घेतात. खरवडलेला भाग प्रथम पांढुरका होतो व नंतर तपकिरी होतो. अशी पाने आकसतात, झाडाची वाढ खुंटते. किडीचा प्रादुर्भाव कोरड्या हवामानात जास्त होतो. हे कीटक स्पॉटेड विल्ट या विषाणूजन्य रोगाचा प्रसार करतात.

## पांढरी माशी

**शास्त्रीय नाव - बेमिसिया टॅबॅकी**

ही बहुपीकभक्षीय कीड असून, वांगी, टोमॅटो, मिरची, भेंडी, वेलवर्गीय भाज्या, कपाशी, सूर्यफूल इ. अनेक पिकांवर उपजीविका करते.

### ओळख व जीवनक्रम

- **अंडी अवस्था :** अंडे उभट आकाराचे २ मि.मी लांब, नारिंगी रंगाचे असून ते साध्या डोळ्यांना दिसत नाही.
- **पिलावस्था :** गोलाकार, पिवळसर असून विशेषतः जमिनीलगत असलेल्या जून पानाच्या खालील बाजूस जास्त असतात.
- **कोष अवस्था :** ही पानाच्या खाली असते.
- **प्रौढ माशी :** पांढऱ्या रंगाची माश्या पानाच्या खालील आणि वरील बाजूस दिसतात.

### लक्षणे व नुकसानीचा प्रकार

- पिले व प्रौढ पानातील रस शोषून घेतात. त्यामुळे पाने पिवळी पडून वाळतात.
- माशीच्या शरीरातून स्रवलेल्या गोड द्रव पदार्थांमुळे पानावर काळ्या बुरशीची वाढ होते. पाने काळी पडतात. पर्यायाने कर्बग्रहणाची क्रिया मंदावते.
- हे कीटक लीफ कर्ल (पर्णगुच्छ) या विषाणूजन्य या रोगाचा प्रसार करतात.

## मावा

मावा किडीच्या अनेक प्रजाती असून, त्यापैकी ॲफिस गॉसिपी, मायझस पर्सिकी या प्रजाती टोमॅटो पिकावर आढळतात. वांगी, भेंडी, वाल, वेलवर्गीय भाज्या, बटाटे, मिरची इ. पिकावर हे कीटक जगतात.

### ओळख व जीवनक्रम

- कीटक गोलाकार, पिवळसर, २ ते ३ मि.मी. आकाराचे पानाच्या खाली पुंजक्याने बसलेले आढळतात. हे जास्त हालचाल करीत नाहीत.
- पिले आणि प्रौढ पानातील रस शोषतात. त्यामुळे पाने पिवळी पडतात. पाने निस्तेज होतात. पानाच्या कडा खालील बाजूस वळतात.
- या किडीमुळे कुकुम्बर मोझॅक विषाणूचा प्रसार होतो.



मावा



पांढरी माशीचा टोमॅटोवरील प्रादुर्भाव.

### एकात्मिक कीड व्यवस्थापन

- ज्या शेतात पूर्वी तूर, कपाशी हरभरा, वांगी, मिरची पिके घेतली असतील, तिथे टोमॅटो पिकाची लागवड करू नये.
- शेताची खोल नांगरट करावी.
- रोपांची निगा रोपे तयार करताना रोपांच्या वाफ्यावर मसलीन किंवा नायलॉन कापडाचे आच्छादन घालावे. म्हणजेच रोपांचे रस शोषक किडीपासून संरक्षण होते.
- टोमॅटोची रोपे तयार करण्यापूर्वी झेंडूची रोपे तयार करावीत. टोमॅटोच्या पुनर्लागवडीपूर्वी टोमॅटोच्या प्रत्येक १० ओळीत झेंडू लावावीत.
- टोमॅटोची पुनर्लागवड करण्यापूर्वी रोपे जैविक घटकांचे मिश्रण (फुले सुपर बायोमिक्स) ५० ग्रॅम प्रति १० लिटर पाणी या प्रमाणाच्या द्रावणात १०-१५ मिनीट बुडवून नंतर लावावीत.
- लागवडीनंतर ३० दिवसांनी पिकावर रसशोषक किडीचा प्रादुर्भाव दिसू लागताच निंबोळी अर्क (५ टक्के) फवारणी करावी.
- शेतामध्ये एकरी २० ते २५ पिवळे चिकट सापळे लावावेत.

**रासायनिक नियंत्रण**

- या रसशोषक किडींच्या नियंत्रणासाठी, सायअँन्ट्रानिलीप्रोल (१०.२६ टक्के ओडी) १८ मि.लि. किंवा फ्लोनिकॅमिड (५० टक्के डब्ल्यूजी) ४ ग्रॅम प्रति १० लिटर पाणी या प्रमाणे फवारणी करावी.

**(टीप - कीडनाशक फवारणीचे प्रमाण हाय व्हॉल्यूम पंपासाठीचे आहे.)**

**डॉ. एस. एम. गांगुर्डे** ☎ ९४०३१८९१०२

(डॉ. गांगुर्डे हे कनिष्ठ कीटकशास्त्रज्ञ, प्रा. बाचकर हे कनिष्ठ रोगशास्त्रज्ञ आणि प्रा. पाटील हे वरीष्ठ भाजीपाला पैदासकार म्हणून अखिल भारतीय समन्वित संशोधन प्रकल्प - भाजीपाला पिके, महात्मा फुले कृषी विद्यापीठ, राहुरी येथे कार्यरत आहेत. )

● कीडनाशकांच्या शिफारशी लेबल क्लेमप्राप्त किंवा जॉएंट ॲग्रेस्कोप्राप्त आहेत. ● फवारणीचे प्रमाण हाय व्हॉल्यूम फवारणी पंपासाठीचे आहे. ● खरेदीवेळी पक्के बिल घ्यावे. ● बॅन किंवा 'रेस्ट्रिक्टेड' आहे का पाहावे. ● लेबल क्लेम वाचावेत. ● पुरेशा ज्ञानाशिवाय रसायने एकमेकांत मिसळू नयेत. ● रसायनांचा गट तपासावा. ● पीएचआय, एमआरएल तपासावेत. ● पेरणी वा लागवडीपूर्वी संबंधित बियाणांवर कोणती बीजप्रक्रिया केलेली आहे, हे तपासूनच पुढील बीजप्रक्रिया करावी.

**● मधमाशी, मित्रकीटकांना हानिकारक कीडनाशकांचा वापर टाळावा.**
**● पीक फुलोरा अवस्था लक्षात घेऊन कीडनाशकांचा समंजस वापर करावा.**

